**राज्य मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल केलेली तक्रार**

**क्र. : मुमाआ-२०२३/नों. क्र. ३३७/त. क्र. ६८/२३/०१**

**श्री. गोविंद बालाप्रसाद करवा**
रा.फ्लॅट नं.१०३, राज रेसीडेन्सी ओ,
जिजाऊ नगर, शारदानगर कॉर्नर,
नांदेड ४३१६०५.

**विरुध्द**

**जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी (नवि-२४)**
नगर विकास विभाग, मादाम कामा मार्ग,
हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.

**प्रथम अपिलिय अधिकारी तथा उपसचिव (नवि-२४)**
नगर विकास विभाग, मादाम कामा मार्ग,
हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.

| | | |
|---|---|---|
| **तक्रारीचा दिनांक** | : | १३.०२.२०२३ |
| **सुनावणीचा दिनांक** | : | **२४.०३.२०२३** |
| तक्रारदार | : | उपस्थित |
| जन माहिती अधिकारी | : | उपस्थित |
| प्रथम अपिलीय अधिकारी | : | अनुपस्थित |

तक्रारदार यांनी दि. रोजी दाखल केलेल्या द्वितीय अपीलाबाबत अपील क्र.मुमाआ-२०२२/नों.क्र. २२०७७/अपील क्र. १२५/२०२३/०१ नुसार "मा. आयुक्त, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका यांनी नगरविकास विभागाकडे दि. ०७.१२.२०२१ रोजी नोंदणी शाखेत सादर केलेल्या अधिकारी व कर्मचारी सेवा प्रवेश नियम व आकृतीबंधाच्या संयुक्त प्रस्तावाची परिशिष्ट अ, ब, क, ड सह मूळ प्रत, सोबतची पत्रे, स्थायी व सर्वसाधारण सभेचे ठराव तसेच इतर कागदपत्रे तसेच प्रस्तावाच्या अनुषंगाने माहिती देईपर्यंत केलेली कार्यवाहीयाबाबत" माहिती मागितलेली असून राज्य माहिती आयोगाने दि. १७.०२.२०२३ रोजीच्या आदेशान्वये जन माहिती अधिकारी तथा सहायक कक्ष अधिकारी, श्रीम. मीनल भोसले यांना असे आदेश देण्यात येते की, अंतिम निर्णय झाल्यानंतर नांदेड-वाघाळा शहर महानगरपालिका कर्मचाऱ्यांच्या आकृतीबंध व सेवा प्रवेश नियमाची प्रत अपीलकर्त्यांना नि:शुल्क देण्यात यावी. तथापि अद्याप माहिती मिळाली नसल्याने तक्रारदार यांनी दि. १३.०२.२०२३ रोजी आयोगापुढे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अन्वये तक्रार दाखल केली आहे.

तक्रारदार यांनी त्यांच्या दि. १७.१२.२०२१ रोजीच्या अर्जान्वये मागितलेली माहिती अद्याप तक्रारदार यांना मिळालेली नसल्याचे सांगितले.

आजच्या तक्रारीच्या सुनावणीस विद्यमान जन. माहिती अधिकारी तथा अवर सचिव, श्री. अनिलकुमार उगले व सहायक कक्ष अधिकारी, श्रीम. मिनल भोसले उपस्थित आहेत.

विद्यमान जन माहिती अधिकारी तथा अवर सचिव, श्री. अनिलकुमार उगले यांनी असे विशद केले की, नांदेड-वाघाळा शहर महानगरपालिका कर्मचाऱ्यांचा आकृतीबंध मंजूर झालेला असून सदर मंजूर झालेल्या आकृतीबंधाची प्रत त्यांच्यासोबत घेऊन आले आहेत.

तक्रारकर्ता यांनी असे विशद केले की, त्यांना संबंधित नस्तीचे निरीक्षण हवे आहे.

विद्यमान जन माहिती अधिकारी तथा अवर सचिव, श्री. अनिलकुमार उगले यांना असे आदेश देण्यात येत आहेत की, अपीलकर्ता यांना आज दि. २४.०३.२०२३ रोजी संबंधित नस्तीचे निरीक्षण करण्याची संधी देण्यात यावी व त्यानंतर त्यांना हव्या असलेल्या माहितीच्या पृष्ठांचे छायाचित्रे काढण्यास मुभा दयावी.

विद्यमान जन माहिती अधिकारी तथा अवर सचिव, श्री. अनिलकुमार उगले यांनी पुढे असे विशद केले की, नांदेड-वाघाळा शहर महानगरपालिका सेवा प्रवेशचे अंतिम निर्णय झाले नसल्यामुळे अपीलकर्ता यांना माहिती देणे शक्य नाही.

विद्यमान जन माहिती अधिकारी तथा अवर सचिव, श्री. अनिलकुमार उगले यांना पुढे असे ही आदेश देण्यात येत आहेत की, नांदेड-वाघाळा शहर महानगरपालिका सेवा प्रवेशचे अंतिम निर्णय झाल्यानंतर तक्रारकर्ता यांना संबंधित नस्तीचे निरिक्षण करण्याची संधी देण्यात यावी व त्यानंतर त्यांना हव्या असलेल्या माहितीच्या छायांकित प्रती १०० पृष्ठांपर्यंत विनामुल्य देण्यांत याव्यात. (अपीलकर्ता यांना १०० पृष्ठांच्यावर माहिती पाहिजे असल्यास प्रत्येक पृष्ठांसाठी नियमित शुल्क आकारुन माहिती पुरविण्यात यावी.)

**आदेश**

**तक्रार निकाली काढण्यात येत आहे.**

**मुंबई**
**दिनांक : २४.०३.२०२३**

(सुमित मल्लिक)
राज्य मुख्य माहिती आयुक्त

*Pragati 24.03.2023*